# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com


जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-१/ २०१७/ ६५६३ दिनांक- 28 NOV 2017

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जि . प . पुणे/अहमदनगर/सोलापूर .

**विषय ः- उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षणासाठी अर्हताप्राप्त शिक्षकांची नावे मागविणे व मे/जून 2018 मध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करणेबाबत .**

संदर्भ ः- मा . विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य शिक्षण मंडळ,पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचेकडील जा . क . रा . मं/पापुई-1/उमासेप्र-2017/5019 दि . 06 . 10 . 2017 .

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन सन 2018 मध्ये करण्यात येणार आहे .

**निवडश्रेणी-** ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा 31 मे 2018 रोजी 24 वर्षे पूर्ण व त्याहून अधिक पूर्ण होत आहे अशा प्रमुख विषयांच्या शिक्षकांचे **(5 दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व 16 दिवसांचे गृहकार्य)** निवडश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षण मे/जून 2018 मध्ये आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे .

**वरिष्ठ वेतनश्रेणी-** ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा 31 मे 2018 रोजी 12 वर्षे पूर्ण व त्याहून अधिक पूर्ण होत आहे अशा प्रमुख विषयांच्या शिक्षकांचे **(10 दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व 11 दिवसांचे गृहकार्य)** वरिष्ठ वेतनश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षण मे/जून 2018 मध्ये आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे . (अल्पसांख्यिक विषयासाठी सदर प्रशिक्षण 5 दिवसांचे राहील) वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणासाठी प्रत्येक विभागीय मंडळाने खालीलप्रमाणे विषय गट राहतील तर अल्पसंख्य विषयांचे प्रशिक्षण मात्र राज्यात एकाच ठिकाणी आयोजित होईल .

- प्रशिक्षण वर्ग-1 **विषय** -मराठी, हिंदी, इंग्रजी
- प्रशिक्षण वर्ग-2 **विषय** -भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि संख्याशास्त्र
- प्रशिक्षण वर्ग-3 **विषय** -अर्थशास्त्र, पुस्तपालन व लेखाकर्म, वाणिज्य संघटन व व्यवस्थापन, चिटणिसाची कार्यपध्दती, सहाकार
- प्रशिक्षण वर्ग-4 **विषय** -इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र
- प्रशिक्षण वर्ग-5 **अल्पसांख्यिक विषय फक्त 5 दिवसांचे प्रशिक्षण**

  **विषय -** उर्दु, गुजराती, संस्कृत, पाली, अर्धमागधी, सिंधी (अ),कन्नड, तेलगू, पर्शियन, तामिळ, पंजाबी, फेंच, अरेबिक, संगीत, गृहशास्त्र, अन्नशास्त्र, वस्त्रशाश्त्र व बालविकास, भूशास्त्र, संरक्षणशास्त्र, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षण, तत्वज्ञान, तर्कशास्त्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, कृषिविज्ञान आणि तंत्रज्ञान, पशूविज्ञान आणि तंत्रज्ञान इ .

1 . उपरोक्त प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणासाठी विषयनिहाय गट राहतील . एका प्रशिक्षण वर्गात 50 ते 60 प्रशिक्षणार्थी याप्रमाणे प्रशिक्षणाचे नियोजन राहील .

2 . निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण गटनिहाय नसून ते सर्व विषयांसाठी एकत्रित असल्याने एका प्रशिक्षण वर्गात 50 ते 60 प्रशिक्षणार्थी याप्रमाणे प्रशिक्षणाचे नियोजन राहील .

3 . वरील विषयांच्या गटात एका वर्गासाठी (50 ते 60 शिक्षक) शिक्षक संख्या पुरेशी नसल्यास दोन गटातील विषयांचा एक वर्ग करण्यात यावा .

4 . अल्पसांख्यिक विषयांची नावे अत्यंत अल्प असतात त्यामुळे सर्व विभागाची माहिती राज्यमंडळ सादर झाल्यानंतर संपूर्ण राज्यासाठी एकाच विभागात केंद्राचे नियोजन करण्यात येईल .

5 . मे/जून 2018 मध्ये आयोजित करावयाच्या प्रशिक्षणाचे सर्व नियोजन दि . 30 नोव्हेंबर 2017 पर्यंत मार्फत राज्यमंडळास सादर करण्यात यावे .

6 . प्रशिक्षणाचे संपूर्ण नियोजन झाल्यानंतर प्रशिक्षणाचे दिनांक निश्चित करण्यात येतील .

7 . उपरोक्तबाबत पुन्हा स्मरणपत्र द्यावे लागणार नाही असे पहावे .

8 . निवड व वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणासाठी शिक्षकांची नावे गतवर्षीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत .

तरी प्रशिक्षणाच्या नियोजनाची उपरोक्तप्रमाणे तातडीने कार्यवाही सुरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (प्रशिक्षणाच्या संपूर्ण नियोजनासह) दि . 30 नोव्हेंबर 2017 पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावा .

(मिनाक्षी राऊत)
सहाय्यक शिक्षण संचालक
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग,पुणे-01 .

**प्रत माहितीसाठी :-**

मा . विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य शिक्षण मंडळ,पुणे विभागीय मंडळ, पुणे .

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

## -: निवेदन :-

**उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी "वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" सेवांतर्गत प्रशिक्षण-२०१८**

उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी सेवान्तर्गत प्रशिक्षण माहे मे/जून २०१८ मध्ये विभागीय मंडळनिहाय आयोजित करावयाचे आहे. प्रशिक्षणासाठी अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी प्रशिक्षण घेण्याकरिता Online अर्ज सादर करावयाचे आहेत. मंडळाच्या **http://traning.mh-hsc.ac.in या वेबलींकवर दि.३०/११/२०१७** पर्यंत प्रशिक्षणनिहाय वेगवेगळे / स्वतंत्र Online फॉर्म/अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी Online भरलेल्या अर्जाची प्रिन्ट घेऊन आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांमार्फत संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्य.)/ विभागीय शिक्षणउपसंचालक या कार्यालयांकडे तातडीने पाठविण्याची व्यवस्था करावी.

**"वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" प्रशिक्षणासाठी विहित पध्दतीने संबंधित कार्यालयाकडे अर्जाची प्रिंट सादर केलेल्या शिक्षकांची शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता तपासून-पडताळणी करुन प्रशिक्षणासाठी पात्रतेच्या शिफारशीसह ज्या शिक्षकांची नावे मंडळाकडे प्राप्त होतील अशाच शिक्षकांना प्रशिक्षणात सामावून घेण्यात येईल.** दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | प्रशिक्षण | अर्हता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ वेतनश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत १२ **वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. *( ११ वर्षे व १० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |
| २ | निवडश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत २४ **वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. २) एम.एड. अथवा एम.फिल. अथवा पी.एच.डी. अथवा एम.एस.ए.सी.आय.टी (MSACIT) *( २३ वर्षे व २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |

**टिप:-** *प्रशिक्षणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या नावांनुसार प्रशिक्षणाची केंद्रे निश्चित करताना आवश्यकतेनुसार क्रमश: १२, ११, १० व २४, २३, २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांचा प्रशिक्षणासाठी विचार केला जाईल. अशा शिक्षकांना प्रशिक्षणात सामाऊन घेणे अथवा न घेणे हा निर्णय सर्वस्वी मंडळाचा राहील. त्याबाबत कोणासही आग्रह धरता येणार नाही, याची नोंद घ्यावी.*

दिनांक: ०६/०९/२०१७
राज्य मंडळ, पुणे-०४.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.